REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# १९९० नंतरच्या कथेतील स्त्रीजीवन व सांस्कृतिक पर्यावरणाचे स्वरुप

प्रा.डॉ.बाळासाहेब गार्डी
पदव्यूत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र, रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर.

## प्रास्ताविक :-



मराठी वाङ्मयामध्ये ८० च्या दशकात मराठी साहित्यात खरे परिवर्तन होऊ लागले अनेक नवीन प्रवाह उदयाला आले. या साऱ्याच प्रवाहामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक घडामोडींचे प्रतिबिंब उमटू लागले. त्यात १९९० नंतर जागतिकीकरणाचा साहित्यावर मोठा परिणाम झाला. केवळ साहित्यावरच नव्हे तर मानवी जीवनावरही जागतिक परिणाम झाला. म्हणूनच नव्वदोत्तरी सांस्कृतिक पर्यावरणात नव्या जाणिवा आल्या. जीवनातील प्रत्येक गोष्ट स्त्रीवादी दृष्टिने पाहिली जाते. स्त्रीच्या वाट्याला येणारे जगणे आणि जागतिकीकरणातून होणारी तिची ओढाताण, कुचंबना तसेच शरीरनिष्ठ अनुभव, सांस्कृतिक परंपरा, विधीकर्म यातून होणारी स्त्रीची फरपट साहित्याद्वारे समोर येऊ लागली. जागतिकीकरणातून अवतरलेली नवी सुसंगवेदना घेऊन स्त्रीवादी साहित्य मराठी साहित्य विश्वात अग्रस्थानी मानले आहे. कुटुंब, समाज, कला, साहित्य, विज्ञान, संशोधन, व्यवहार इ. पर्यंतची ही स्त्रीशक्तीची ऊर्जा विशिष्ट मूल्यदृष्टी घेऊन अवतरली आहे. म्हणूनच १९९० नंतर सांस्कृतिक पर्यावरणातून उमटणारी स्त्री प्रतिमा अगळीवेगळी आणि अनवट आहे असे मला वाटते.

## ● सांस्कृतिक पर्यावरणाचे स्वरुप :-

जागतिकीकरणाच्या आक्रमणामुळे पाश्चात्य संस्कृती वेगाने आक्रमकपणे भारतात येत आहे. सांस्कृतिबद्दल डॉ. कृष्णा इंगोले म्हणतात, ‘‘टी. व्ही. सारख्या माध्यमातून आपल्या कुटुंबसंस्थेवरही गौरव केला जात आहे. नात्याचे संबंध पातळ होत आहेत. त्यात जिव्हाळा प्रेम, स्नेह राहिला नाही. त्यामुळे प्रेमविवाह, घटस्फोट, हुंड्यासाठी छळ, करियरच्या मागे लागल्यामुळे उशिरा लग्न, अविवाहित राहणे याचे प्रमाण वाढत आहे. षटकोनी कुटुंब चौकोनी, त्रिकोणी करत एकाकी होत आहे. त्यातू वृध्दांना स्थान नाही. त्यामुळे वृध्दाश्रम वाढत आहेत. भारतीय संस्कृतीचे सामर्थ्य कुटुंब व्यवस्थेत आहेत. ते उद्‌ध्वस्त झाले की संस्कृती उद्‌ध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही.’’ माणसामाणसातील स्नेह कमी होत आहे. समाजात जागतिकीकरण आणि खाजगीकरण यामुळे तीर्व स्पर्धा निर्माण झाली आहे. याच स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी एकमेकांची गळे कापण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर स्त्रियांच्या प्रश्नांनी अत्यंत भयानक रुप घेतले आहे. एकीकडे पुरुषाशी बराबरी करण्यासाठी या स्पर्धेत सहभागी झालेली स्त्री आणि दुसरीकडे पुरुषप्रधान व्यवस्थेचा स्त्रियांकडे बघण्याचा भोगवादी दृष्टिकोन यामुळे भोगवादी संस्कृतीला बळी पडलेली स्त्री हा सगळा विरोधाभास जीवघेणा आणि स्त्री जीवन विनाशाच्या दिशेने नेणारा आहे. प्रसारमाध्यमाद्वारे होणाऱ्या भोगवादी स्त्री चित्रणामुळे स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिक खालावत चाललेला आहे. समाजाच्या भावना एवढ्या बोधट बनत चालल्या आहेत की, या सर्व गोष्टींकडे फारशा गांभीर्याने बघितले जात नाही. एकीकडे जागतिकीकरणाचा वाढता रेटा तर दुसरीकडे भारतात वाढत जाणारी धर्मांधता आणि जातीयता यामुळे स्त्रियांपुढील आव्हाने वाढत असून या सगळ्या संघर्षात ‘स्त्री’ला लक्ष बनविले जाते. वंदना महाजन म्हणतात, ‘‘संस्कृतीच्या वयाबरोबर समृध्दी व वैभवाचे डंके पिटले गेले. संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचे ढोल बडविले गेले; पण तरीही स्त्रियांच्या परवशतेचे, गुलामगिरीचे आणि अश्रूंचे मूल्य संस्कृतीच्या तथाकथित कैवाऱ्यांना पूर्णपणे आकळता आले नाही. विश्वाच्या अजेंड्यावर अनेक धर्म उदयास आले. अनेक पंथ, संप्रदाय निर्माण झाले. देवांची संख्या ३३ कोटींच्या वर गेली आणि प्रेषित तीर्थकारांची संख्याही वाढत गेली; पण तरीही स्त्रीच्या वेदनेचे मूल्य अधोरेखित होऊ शकले नाही.’’ म्हणजेच भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांचा दर्जा दुय्यम आणि हीन ठरवलेला आहे. त्यामुळे पुरुष वर्चस्वाच्या भारतीय समाजरचनेत हजारोवर्ष स्त्रियांचा भावनिक कोंडमारा होत आला आहे.

मुलीच्या जातीन कसं जगावं याचे संस्कार लहानपणीच केले जातात. पतीचे घर हे तिचे सर्वस्व आहे. आणि तो कसाही असला तरी पत्नीने आपला सेवाधर्म चोखपणे बजावला पाहिजे हे परंपरेने मुलीच्या मनावर बिंबवले जाते. स्त्रीचे चारित्र्य शुध्द असावे, तिने आपले पावित्र्य जपले पाहिजे, घराची अब्रू, प्रतिष्ठा सांभाळली पाहिजे. अशा सामाजिक बंधनांच्या पगडा स्त्रियांवर लादला जातो. मंगळसूत्र, कुंकू, बांगड्या, स्त्रियांचे अलंकार, पेहराव या गोष्टीही या संस्कृतीने स्त्रियांवर लादलेल्या आहेत. याबाबींचे उल्लंघन केल्यास आजही स्त्रियांची कुचेष्ठा होताना दिसते. या कुचेष्टेच्या माध्यमातून होणाऱ्या छळास स्त्रीला सामोरे जावे लागते. संस्कृतीच्या बाबतीत अजूनही स्त्री परावलंबीच आहे. यातून निर्माण होणाऱ्या समस्या १९९० नंतरही लेखिकांनी आपल्या कथांमधून हाताळल्या आहेत.

## ०१. विवाहसंस्थेतील स्त्री संदर्भात अनुभवाचे स्वरुप :-

सांस्कृतिक जीवनातील लग्नविधी हा एक पवित्र संस्कार मानला जातो. विवाहसंस्थेविषयी एक मांगल्याचे वलय निर्माण करण्यात आले आहे. लग्न या परिभाषेत एका घरातून मुळे उपटून दुसऱ्या घरात ती पुन्हा रुजविणे तसे अवघडच. यमध्ये जराही गफलत झाली तर आयुष्याची होरपळच तिच्या वाट्याला येत असते. त्यात समाजव्यवस्थेत व निवडीचे स्वातंत्र्यही तिला नसते. मुलगी म्हणजे घराचा भार हा भार शक्य तितक्या लवकर कमी करण्यासाठी घरातील वडीलधारी माणसे मुलीच्या इच्छा-आकांक्षाचा विचार न करता एखाद्या श्रीमंत, आर्थिक स्थिती पाहून लग्ने ठरवत. त्यात मुलाचे वय, रुप, सवयी यांचाही विचार केला जात नाही. परंतु विवाहसंस्थेत मुलीलाही वर निवडीचे स्वातंत्र्य हवे. भावी पती आपल्या विचारांशी सहमत असणारा, आपल्याला समजून घेणारा असला पाहिजे. अशा मतांचा पुरस्कार करणाऱ्या काही कथा १९९० नंतरच्यचा स्त्री लेखिकांनी लिहिल्या आहेत.

आंबिका सरकार यांच्या 'पारख' (चौकट) या कथेत विवाह पध्दतीतून उपस्थित होणारे प्रश्न, आधुनिक स्त्रीची विवाहपध्दतीत होणारी घुसमट चित्रीत होते. अमेरिकेहून आलेला विलास जोशी पाहायला येतो तेव्हा लेखिकेने केलेले वर्णन अत्यंत बोलके आहे. 'त्याची आपल्या साऱ्या शरीरावरुन सावकाश फिरणारी नजर एक्सरे किरणांसारखी आत, वस्त्राआड शिरु पाहते आहे असा चमत्कारिक भास झाला. नंतर त्यानं तितकीच संथ खोल नजर हेमाच्या अंगावरुन फिरवली तिही तिच्या नजरेतून सुटलं नाही.'' (पृ. ८३) या अनुभवाने विवाहसंस्थेकडे ती तिरस्काराने पाहते. तर प्रिया तेंडुलकरांच्या 'अंघोळ' कथेतही जाहिरातीचा व्यवसाय करणाऱ्या नायिकेवर देवदत्त आणि अजय प्रेम करतात आणि व्यवसाय सोडत नाही म्हणून नकार देतात. तर 'घसरण' (जावे तिच्या वंशा) या कथेतील नायिका विवाहसंस्थेसंबंधी म्हणते, ''विवाहसंस्था नैसर्गिक नाही. माणसाने घडविलेली आहे. आणि म्हणूनच ती अनैसर्गिक आहे, कृत्रिम आहे. मॅरेज इन मॅनमेड. हेन्स सिंथेटिक, कृत्रिम असलेले काहीही फार काळ टिकू शकत नाही.'' स्त्रिचे शोषन करणारी ही व्यवस्था बदलली पाहिजे अशी प्रिया तेंडुलकरांची दृष्टि दिसून येते. या लग्न संस्थेविषयी मंगला आठलेकर म्हणतात, ''लग्न म्हणजे बांधिलकी. लग्न म्हणजे पुरुषाच्या मनात जागी होणारी मालकी हक्काची जाणीव. ही जाणीव नाहिशी करायची असेल तर लग्नसंस्थाच मूलभूत नाकारीली पाहिजे. स्त्री-पुरुषांनी विवाहविधीशिवाय विवाहित स्त्री-पुरुषासारखं एकत्र राहवं. म्हणजे कोणी मालक असणार नाही आणि कोणीही गुलाम असणार नाही. वैवाहिक आयुष्यातील जाचाला पर्याय म्हणून अशा तऱ्हेचा एक प्रतिक्रियात्मक विचार स्त्रिया करु लागल्या तर नवल नाही.''

मराठी कथेतील स्त्री लेखिका मंगला आठलेकरांनी सुचीत केलेल्या वरील पर्यायासारखा दृष्टिकोन मनामध्ये ठेवून गौरी देशपांडे यांनी विवाहसंस्थेविषयी बंडखोर, स्वतंत्र विचार मांडण्याचा प्रयत्न काही कथांतून केलेला आहे. मराठी कथेतील सांस्कृतिक विश्वाला हा विचार पूर्णतः नवा आहे. 'ओहोटी' (आहे हे असं आहे) या कथेत विवाह न करता एकत्र राहणाऱ्या स्त्री-पुरुषाचे चित्रण येते. कथेचे नायक राम व नायिका सोना समविचारांनी एकत्र येतात. विवाह नाकारुन एकत्र राहतात.

लेखिका विजया राजाध्याक्ष यांच्या 'जानकी देसाईचे प्रश्न' (अन्वयार्थ, २००१) या कथेत विवाह न करता एकत्र राहणाऱ्या स्त्री-पुरुषाचे चित्रण येते. आधुनिक वातावरणात लहानाची मोठी झालेली जानकी शिक्षण संपल्यानंतर लग्न न करता सुजित बॅनर्जी या मित्राबरोबर लग्नाशिवाय एकत्र राहण्याचा धाडसी निर्णय घेते. परंतु भारतीय समाजव्यवस्थेच्या सांस्कृतिक वातावरणात लग्नाशिवाय एकत्र राहणे फार काळ टिकत नाही. दोघांतल्या विशुध्द मैत्रभावाकडेही समाज शंकेने पाहतो. जानकीला मूल हवे असते. परंतु सुजितला मुलाची जबाबदारी नको असते. शिवाय या मुलाकडे समाज कोणत्या दृष्टिने पाहिल, त्यामुळे त्याला पुढे त्रास होईल का, असे प्रश्न तो उपस्थित करतो. परतुं जानकी आतून येणारी उर्मी दाबून ठेवू शकत नाही. ''कोणत्याही भूमिकेत स्त्रीला आपले स्त्रीपण विसरता येत नाही. त्या स्त्रीपणात स्थैर्याची ओढ सामावलेली आहे. कुटुंब, मुले या सगळ्या गोष्टी तिला हव्या असतात.'' (पृ. १३३) विवाहशिवाय जानकीला हवे असलेले स्थैर्य आपल्या समाजाव्यवस्थेत मिळविता येत नाही. त्यामुळे आजही विवाह संस्थेचे महत्त्व तितकेच अबाधित राहिलेले दिसून येते. विवाह संस्था ही स्त्रीयांच्या विकासाची पाऊलवाट ठरण्याऐवजी स्त्रियांच्या निर्भरशीलतेचा गळा घोटणारी चौकटबंद व्यवस्था आहे असे म्हणणे इतपत निराशाजनक चित्र स्त्रियांच्या कथांतून प्रतिबिंबीत झालेली आहे.

मेघना पेठे यांनी आपल्या कथांमधून आधुनिक स्त्री जीवनाशी आणि त्यातही महानगरीय संवेदनेशी नाते सांगणारी, समकालीन प्रश्न-समस्यांचा, जीवनाचा वेध घेतला आहे.

थोडक्यात विवाहसंस्थाही स्त्रीच्या स्वातंत्र्याला आडकाठी आणणारी व्यवस्था आहे. पुरुषप्रधान संस्कृतीची जोपासना करणारी व्यवस्था आहे असे स्त्री लेखिकांच्या कथांमधून प्रत्ययास येते.

### ०२. कुटुंब व्यवस्थेची उतरती कळा :-

सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक फेरबदल यामुळे कुटुंबविषयक बदल अपरिहार्य ठरला आहे. मार्क्सवादी दृष्टिकोनातून कुटुंबसंस्था ही समाज जीवनाचे प्रमुख अंग असते. पतीपत्नीस बंध ही कुटुंबसंस्थेची जीवधर्मीय गरज आहेच, पण ती तितकीच सांस्कृतिक वर्गरचनेची अंगभूत बाब आहे. कुटुंबसंस्था ही त्या-त्या काळातील नैतिक नियमांनी बांधून ठेवलेली असते. दिवसेंदिवस एकत्र कुटुंब पध्दती कमी होत चालली आहे आणि विभक्त कुटुंबपध्दती वाढत आहे. एकत्र कुटुंबामध्ये श्रमाची विभागणी होत असे. प्रत्येकाच्या जबाबदाऱ्या ठरलेल्या असतात. सर्वाच्या विचारांचे निर्णय घेतले जात. कुटुंबामध्ये एकजिनसीपणा होता. घरच्या स्त्रीला मुलांच्या संगोपणाकडे फारसे लक्ष द्यावे लागत नसे, अर्थार्जनाची जबाबदारी विभागून असल्यामुळे कुटुंबामध्ये तितकेसे ताणतणाव नव्हते. सर्व आप्तसोकीय, नातेवाईक यांच्या प्रेमाचा ओलावा असत. त्यामुळे कुटुंबविषयक मूल्यभावाचे संवर्धन होत असे. परंतु व्यक्तिस्वातंत्र्य, वैयक्तिक महत्त्वकांक्षा, वैयक्तिक गरज आणि विचार यामुळे संयुक्त कुटुंब पध्दतीला उतरतीकळा लागून विभक्त कुटुंबपध्दती निर्माण होत गेली. त्यामुळे कुटुंबे छोटी झाली. नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने बाहेरगावी जावे लागले. आई-वडील, नातेवाईक, घरापासून दूर राहिल्याने एकमेकांमधील ओढा कमी झाला, नातेसंबंध तुटत गेले, त्यांच्यातील स्नेह कमी झाला. त्यातूनच आई वडीलांना सांभाळण्याचा, मुलांच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण झाला. आजोबा-आजीला पारखी झालेली, त्यांच्यापासून दुरावलेली आधुनिक यंत्र सामग्रीमध्ये रस घेणारी, एकलकोंडी मुलं दिसताहेत. एकत्र कुटुंबपध्दतीमध्ये नातेसंबंधाचा मोठा आधार होता. विभक्त कुटुंबपध्दतीमध्ये प्रेमाला पारखी झालेली असुरक्षित, चिंताग्रस्त माणसे दिसताहेत परंतु एकत्र कुटुंबपध्दतीमध्ये स्त्रीकडे राबराबणारी, घरकाम करणार, 'चुल आणि मूल' यामध्ये स्वतःला झोकून दिलेली, प्रजोत्पादनाचे यंत्र म्हणून पाहिले जात असे. विभक्त कुटुंबामध्ये स्त्री-पुरुष समानता ही कल्पना हळूहळू दृढ होऊ लागली. कुटुंब व्यवस्थेत पुरुषांनी स्त्रियांची काही कामे आपल्याकडे घ्यावीत असे सूचित करण्यात येत आहे. एकूणच सामाजिक संकेत व्यवस्थेत बदल होऊ लागले आहेत. पूर्वी घरकाम हे स्त्रियांचे कार्यक्षेत्र असे, परंतु आज मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्री नोकरी / व्यवसायासाठी घराबाहेर पडू लागली आहे. त्यामुळे लिंगभेदावर आधारलेली कुटुंबव्यवस्थेतील कामांची संकेतव्यवस्था बदलवणे ही काळाची गरज आहे. या बदलाची चाहूल नव्वदोत्तरी कथेत जाणवते.

प्रसिध्द लेखिका सानिया यांच्या कथाविश्वात आंघोळीला पाणी गरम करणे, अंडी फ्राय करणे, इस्त्री करणे इ. घरगुती कामांत पुरुष बायकोला सहकार्य करु लागलेला दिसतो. तसेच 'प्रतिती' या कथेत "आई-मुलगा-बाप यांच्यातील संवाद अतिशय मोकळेपणाने होताना दिसतात. आपले लग्न कसे जुळले त्याच्या हकिगती बाप आपल्या मुलीला मोकळेपणाने सांगताना दिसतो." (पृ. ६३)

विजया राजाध्याक्ष यांच्या 'अनामिक' या कथेची नायिका 'विद्या' नाटकाच्या प्रयोगासाठी वारंवार बाहेर असते. ती जरी एकत्र कुटुंबातून विभक्त होऊन मिया बेबीचा स्वतंत्र संसार मांडून बसली असली, तरी शेजारी राहणारी तिची सासू घरी राहणाऱ्या आपल्या नातवंडोचे संगोपन अतिशय मनापासून करते. ह्या शिकलेल्या आधुनिक विचारसरणीच्या, स्वावलंबी जीवनाचे समर्थन करणाऱ्या स्त्रीला, सासूच्या या जिव्हाळ्याविषयी यत्किंचितही कृतज्ञभाव नाही. सतत बाहेर राहणाऱ्या या आधुनिक मातेपासून तिचा मुलगा मात्र मनाने दूर होतो. त्याला आजीपासून जे वात्सल्य मिळते, ते आईपासून मिळत नाही. त्यामुळे आजीच्या तुलनेत त्याला आई परकी वाटू लागते. जेव्हा विद्याला या दुराव्याची जाणीव होते तेव्हा ती आपला व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेते. परंतु तोपर्यंत खूपच उशीर झालेला असतो. गंभीर आजारातून मृत्यूशय्येवर पडलेला स्वतःचा मुलगा ओळख देत नाही याची सल कायम राहते. नोकरी व्यवसायाचे बाळय क्षेत्र आणि कुटुंब संस्थेतील आंतरक्षेत्र यात समतोल राहिला नाही तर अशी शोकांतिका होते.

आपल्या घराचे घरपण टिकविणे आणि नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी कर्तव्याची जबाबदारी समर्थपणे पेलणे या दोन्ही गोष्टी स्त्रियांनी एकदमच करायच्या ठरवल्या तर ते किती अवघड आहे हेच या कथेतून स्पष्ट होते. स्त्रीने जर पुरुषाप्रमाणे केवळ बाह्य क्षेत्रातील कर्तृत्त्वावर लक्ष केंद्रित करायचे ठरवले तर कुटुंब व्यवस्थाच संपुष्टात येते. परस्परातील संवाद हरवतो. याचे चित्रण विजया राजाध्यक्षांनी आपल्या कथेत केले आहे.

अनुराधा वैद्य यांच्या 'अस्तर' (१९९९) कथेत एकत्र कुटुंबपध्दतीचे चित्रण येते. येथे काम न करता उनाडक्या करत हिंडणारा केशव भेटतो. सून म्हणून घरी आलेल्या सुधाला वाटतं, सगळया घरानं वाळीत टाकलेल्या आपल्या दिराला आपण समतून घ्यावं, चार गोष्टी समजून सांगाव्या पण तिला त्यात अपयश येतं. ती घरच्याप्रमाणे त्याचा द्वेष करते. एकत्र कुटुंबात सुधारणा होत नाही. परिणामी एकत्र कुटुंब विभक्त होते. ग्रामीण भागातील स्त्रीचे जीवघेणे वास्तव प्रतिमा इंगोले यांनी 'परायाची लेक' (१९९१) या कथेत मांडलेली आहे. एकत्र कुटुंबपध्दतीत श्रीमंताच्या घरातून आलेल्या सूनेला व तिच्या माहेरच्या लोकांना अधिक मानसन्मान तर गरीब घरातून

आलेल्या सूनेला तुच्छ लेखले जाते. तिची मानहानी केली जाते. पदोपदी आई-वडिलांना अपमान केला जातो. मोलकरणीसारखी सर्व घरकाम तिला करावी लागतात. उलट मुलगी सुखी व्हावी म्हणून केशरच्या आई-वडिलांनी मागतील तेवढा हुंडा देऊन श्रीमंताच्या घरी मुलगी दिली आहे. परंतु अधिक श्रमाबरोबर अपमान तिच्या वाट्याला येतो. ग्रामीण स्त्रीची होणारी ही कुचंबना प्रतिमा इंगोले यांनी अचूक टिपली आहे. तर 'आनूची आई' (जावे तिच्या वंशा), 'इंडियट बॉक्स' (ज्याचा त्याचा प्रश्न) या दोन्ही कथेत ढासळत्या कुटुंबव्यवस्थेमधील बदलत्या नात्याचा शोध घेतला आहे. वरील कथांचा विचार करता नव्वदोत्तरी स्त्री लेखकांनी ढासळत चाललेली कुटुंबव्यवस्था आणि मूल्यव्यवस्था यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### ०३. स्त्री स्वातंत्र्याचे स्वरुप :-

१९९० नंतर लेखिकांमध्ये बहुतांशी लेखिकामध्ये बहुतांशी लेखिका या उच्चशिक्षित, बुध्दीवादी, विविध क्षेत्र पुरुषांच्या बरोबरीने क्रियाशील असलेल्या आहेत. शिवाय त्या महानगरीय असल्यामुळे मूलतःच त्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या आहेत. स्त्रीमुक्ती चळवळीच्या संपर्कात असल्याने विशिष्ट विचारसरणीने त्या भारावलेल्या आहेत. स्त्री प्रश्नांचे त्यांना समग्र भान आहे. शतकानुशतके स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःख त्यांना अस्वस्थ करते. त्यामुळे इथल्या पारंपारिक व्यवस्थेमध्ये काही मूलभूत फेरबदल व्हावेत. स्त्रीला कुटुंबामध्ये, समाजामध्ये आणि विविधक्षेत्रात सन्मानाचे, बराबरीचे स्थान मिळावे असा त्यांचा दृष्टिकोन आहे. स्त्री अबला नाही तर सबला आहे. हे स्त्रीच्या त्या-त्या क्षेत्रात क्रियाशील असलेल्या कार्यावरुन त्या सिध्द करुन देतात. इथल्या पुरुषप्रधान व्यवस्थेनं तिला जाणीवपूर्वक परावलंबी बनवले आहे. हे परावलंबित्व आणि पुरुषाचं दास्य ती झुगारुन देतांना दिसते. स्त्री ही स्वतंत्र आहे, आत्मनिर्भर आहे. स्त्रीत्वाचा, स्व-जाणिवेचा तिला साक्षात्कार झालेला आहे. स्त्री पुरुष समानतेची नवी व्यवस्था त्या आणू पाहतात. नव्वदोत्तर कथा लेखिकांनी या नव्या जीवन जाणिवेने स्त्रियांचे दास्य, तिचे स्वातंत्र्य, स्त्रियांचे परावलंबीत्व याचे सडेतोड चित्रण आपल्या कथालेखनातून चित्रीत केले आहे.

लेखिका वसुधा पाटील यांच्या कथांतून दिसणाऱ्या नायिका अधिक धीट आहे. "खेळ संपला' (भेट १९९४) कथेतील नायिका निरुपमा ही नचिकेत या बॅडमिंटन खेळाडूबरोबर मनाप्रमाणे विवाह करते. नवरा खेळाडू म्हटल्यावर नोकरी करुन संसार आणि मुलांची जबाबदारी एकटीवर येते. नायिकेत खेळाडू असल्यामुळे अनेक मुली त्यांच्या पाठीमागे लागतात. तोही त्यांना हिंडावतो, फिरावतो, त्यांच्या या प्रेमाच्या भानगडी वृत्तपत्रातून प्रसिध्दही होतात. शेवटी वैतागून, मुलांना घेवून ती माहेरी जाते. "घर सांभाळणं, संसार सांभाळणं ही माझ्या एकटीची जबाबदारी नाही. चार दिवस एकदा तरी फक्त एकट्यानेच घर सांभाळण्याचा प्रयत्न करुन बघ जमताय का ते?" (पृ. १०९,१०४) अशी चिठ्ठी ठेवून जाते. नचिकेतच्या दृष्टिने बायकोचे महत्त्व काहीच नसते. पुढे साधी, सरळ, सोशिक, निरुपमा धीट बनते आणि त्याच्यामुळे घटस्फोटाचा प्रस्ताव ठेवते. घटस्फोट देण्याचे तो नाकारतो तेव्हा ती म्हणते, "तेव्हा तू म्हणायचा, 'पुरुष असाच असतो. तो जर मर्दानी खेळाडू असला तर त्याला या गोष्टी माफच असतात. तू समजून घे मला.' आता मी विचारतेय तुला की, माझ्यात काय कमी आहे. म्हणून मी तुझ्यासारखे वागू नये? तू मला जाब विचारणारा कोण? मी म्हणते, मी ही शिकलेली आहे, माझ्या पायावर उभी आहे. मला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. मी काय करावं, कसं वागावं, माझं आयुष्य कशापध्दतीने घालवावं, हे माझं मी ठरवू शकते तुला डिव्होर्स द्यावाच लागेल." (पृ. ११३)

कमल देसाई यांनी 'मी जेव्हा फॉलस्टाफच्या प्रेमात पडते' (रंग १९९८) या कथेतूनही निर्भर मुक्त स्त्रीचे स्वच्छंदी जीवन चित्रीत केले आहे.

### ● सारांश :-

१९९० नंतरच्या कथालेखिकांनी विवाहसंस्थेच्या माध्यमातून स्त्रीला भोगावे लागणारे सर्वव्यापी, सर्वस्पर्शी दुःख चित्रीत केले आहे. स्त्रीच्या दुःखाचं मूळ विवाह संस्थेत आहे. विवाह संस्था ही स्त्रीच्या स्वातंत्र्याला आडकाठी आणणारी, तिचे परावलंबित्व अबाधित ठेवणारी व्यवस्था आहे. काही लेखिका बंडखोर विचार मांडतात. तर काही पारंपारिक, त्यातील अनिष्ठ, निरर्थक प्रथांवर ताशेरे ओढतात. विवाहसंस्थाच नाकारुन विवाहाशिवाय स्त्री-पुरुषांनी एकत्र राहवे अशी भूमिका घेतांना दिसतात. विवाह संस्थेशी निगडीत असणारी आणि भारतीय स्त्रीला होरपळून टाकणारी समस्या म्हणजे हुंडा पध्दती. हुंड्यासाठी तिचा मानसिक छळ केला जातो. समाज जीवनामध्ये निपुत्रिक स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या यातना, मानहानी, मारहान, घटस्फोट, सवत या समस्यांचे लेखन केले आहे. तसेच गर्भारपण आणि मातृत्व या अनुभूतीशी प्रामाणिक राहून स्त्रीनिष्ठा अनुभव स्त्रियांच्या कथांतून चित्रीत झाले आहेत. स्त्री-पुरुष समानतेच्या माध्यमातून करिअरकडे झुकलेली स्त्री म्हणजे प्रौढ कुमारिकांचाही प्रश्न या लेखिकांनी हाताळला आहे. आधुनिक युगात नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्याही गंभीर स्वरुपाच्या आहेत. मुलांच्या संगोपनाचा प्रश्न, घराची जबाबदारी, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, नोकरी ठिकाणचा स्त्री-पुरुष संबंध, मैत्रभाव या सर्व बाबींचे वस्तूस्थिती दर्शक चित्रण स्त्री लेखिकांनी केल्याचे दिसून येते. बदलत्या काळाचा विचारसरणीचा वेध

घेऊन नव्वदोत्तरी लेखिकांनी दास्यमुक्त बंडखोर आणि स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या स्त्रीचे यथार्थपणे चित्रण केलेले आहे. तसेच पुरुषप्रधान व्यवस्थेत होणारा स्त्रीचा कोंडमारा, कुटुंब प्रमुखाचे वर्चस्व, ढासळत चाललेली कुटुंबव्यवस्था, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वासाठी चाललेला संघर्ष, मुक्तीची आकांक्षा, आत्मनिर्भरता या माध्यमातून लेखिकांनी लेखन केले आहे. या लेखिकांमध्ये प्रिया तेंडूलकर, सानिया, मेघना पेठे, वसुधा पाटील, गौरी देशपांडे, आशा बगे, ललिता गादगे, प्रतिमा इंगोले, नीरजा यांची कथा आधुनिक स्त्रीचे दुःख मांडणारी, आक्रमक बुध्दिनिष्ठ आविष्कार घडविणारी आहे. हे वरील कथा विश्लेषणातून आपल्या लक्षात येते.

- **संदर्भ :-**

०१. आठलेकर मंगला, 'लग्नसंस्थेची आवश्कता', मिळून साऱ्याजणी, दिवाळी अंक, १९९८.
०२. इंगोले प्रतिमा, 'मियाँ बिबी राजी' (हजारी बेलपान) १९९७.
०३. वृत्तपत्र, लोकसत्ता, चतुरंग, शनिवार, दि. १४ डिसेंबर २०१३.
०४. महाजन वंदना, 'सांस्कृतिक प्रवाहांची स्त्रीवादी समीक्षा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, ४ एप्रिल २०११.
०५. तेंडुलकर प्रिया, 'जावे तिचा वंशा', (घसरण).